## “पॅट”ची अनुभवसिध्द प्रभावी आयुर्वेदिक औषधे

- **आपोगॅब टॅब्लेट्स:** - आमांश,पोटांत गॅसेस व बध्दकोष्ठ.
- **कॅल्सिपॅट - एफ टॅब्लेट्स:** - रक्तांतील लोहतत्व वाढविते व हाडाना बळकटी देते.
- **फ्लूमल टॅब्लेट्स:** - मलेरिया व फ्लू च्या तापामध्ये उपयोगी.
- **हेमोपॅट टॅब्लेट्स:** - रक्त शुध्द करते व रक्तातील लोहाचे प्रमाण वाढविते.
- **लॅक्सोपॅट (स्ट्रॉंग) टॅब्लेट्स:** - जुनाट व तीव्र बध्दकोष्ठामध्ये अत्यंत प्रभावी.
- **मधुपॅट (रेग्युलर) टॅब्लेट्स:** - सौम्य मधुमेहामध्ये (प्रमेह) उपयोगी.
- **मेदोपॅट टॅब्लेट्स:** - मेदोरोग व स्थौल्यामध्ये उपयोगी.
- **मायोपॅट टॅब्लेट्स:** - ह्रदयविकारामध्ये उपयोगी.
- **मस्फ्रोज टॅब्लेट्स:** - आमवात,सांधेदुखी यांवर उपयोगी .
- **नर्व्होपॅट टॅब्लेट्स:** - बुध्दिमत्ता,स्मरणशक्ती व मानसिक सहनशक्ति यांचा दर्जा राखण्यासाठी.
- **सेप्टीपॅट-२५० टॅब्लेट्स:** - प्राथमिक जंतु संसर्गामध्ये उपयोगी.
- **सितोपॅट- एस् टॅब्लेट्स:** - तीव्र व जुनाट खोकल्यासाठी,ब्रॉंकायटीस मध्ये उपयोगी.
- **लॅक्टोपॅट टॅब्लेट्स:** - बाळंतपणामध्ये स्तन्यवर्धक व दुग्धवर्धक
- **पायरोपॅट टॅब्लेट्स:** - अंगातील कडकी,बारीक ताप व शरिरांत मुरलेला ताप यांवर उपयोगी
- **पॅट कफ टॅब्लेट्स:** - सर्दी, घशाची खवखव,खोकल्याची उबळ - ढास यामध्ये उपयोगी, गायक,वक्ते,शिक्षक व फिरते विक्रेते यांना उपयोगी.
- **युरोपॅट टॅब्लेट्स:** - मूत्रदाह,मूतखडा (मूत्राश्मरी) यामध्ये उपयोगी.

इ. स. १९७९ पासून आयुर्वेदाच्या सेवेत!

PAT


## पॅट फार्मास्युटिकल्स प्रा.लि.


यशोमंगल,जुन्या पोस्टाजवळ, डॉ.पटवर्धन रोड,
पनवेल (जि.रायगड)४१०२०६.
ग्राहक संपर्क क्रमांक:- ०२२ - २७४५६०३९
E mail : patpharmapvtltd@gmail.com **Website : www.patpharma.in**



(फक्त आयुर्वेदिक / मेडीकल स्टोअर्स / वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रकाशित)

PAT

# सितोपॅट-एस्

## टॅब्लेट्स







## तीव्र कफ, जुनाट खोकला, इ. मध्ये प्रभावी श्वसनाच्या अनेक विकारांमध्ये उपयोगी

निरंतर निरामय आरोग्याचा महामंत्र :-
संतुलन व संवर्धन करा
रोगप्रतिकारशक्ती, सौंदर्य, बुध्दी, मनसंतुलन व शक्ती ।
“पॅट”ची औषधे देतील निरंतर निरामय आरोग्याची प्राप्ती ।।

।।श्रीगणेशाय नमः।।　　।।श्रीधन्वन्तरये नमः।।　　।।श्रीकरंजेश्वरी नमः।।　　।।श्रीव्याडेश्वराय नमः।।

# सितोपॅट-एस् टॅब्लेट्स

- **घटकद्रव्ये:** समीरपन्नग, पिंपळी, वंशलोचन, कंटकारी, जेष्ठीमध, अडुळसा.

- **रोगाची सामाजिक स्थिती:** हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे,बदलत्या जीवनमानामुळे जुनाट खोकला, श्वसनसंस्थेचा विकार, सतत होणारा सर्दी या तक्रारी हल्ली सतत आढळून येतात. कित्येकदा ह्या तक्रारी पिढीजात,वारसा हक्काने पुढे आलेल्या दिसतात.सतत होणाऱ्या सर्दी खोकल्यामुळे रोग प्रतिकार शक्तीसुद्धा कमी होत जाते आणि जंतुसंसर्ग वाढण्याची शक्यता असते. वाढत्या शहरीकरणामुळे धूळ, धूर, प्रदूषण इत्यादींची समस्या बळावतेय व त्यासोबतच बळावतायत ते श्वसनसंस्थेचे विकार. पूर्वी श्वसनसंस्थेचे आजार हे केवळ वयोवृद्ध माणसांपुरते मर्यादित होते. आजकाल प्रदूषणादी समस्यां मुळे व पाश्चात्य खानपानपद्धती मुळे लहान मुलांमधे देखील रोग प्रतिकार शक्ती कमी झालेली दिसून येते व त्यामुळे श्वसनसंस्थेचे विकार सहज उद्भवतात. बऱ्याच वेळेला इतर आजारांमुळे हॉस्पीटलमधे राहावे लागल्यास कमी झालेल्या रोगप्रतिकारशक्तीमुळे छातीच्या जंतुसंसर्गाची परिस्थिती उद्भवते. आजार बरा होऊन रुग्णालयातून घरी आल्यावरही अनेक दिवसांपर्यंत छातीत कफ साचल्यासारखा वाटणे, पाठीवर झोपल्यास खोकल्याची उबळ येणे, श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे दिसतात. तंबाखू, विडी, सिगरेट सारख्या अत्यंत घातक व्यसनांमुळे श्वसनसंस्था कमजोर होऊन श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो व इतर आजारसुद्धा लवकर होण्याची शक्यता असते. विडी, सिगरेट च्या धुरामुळे केवळ धूम्रपान सेवन करणाऱ्यालाच नव्हे तर आजुबाजूच्या लोकांनाही श्वसनसंस्थेत धूर जाऊन त्याचा त्रास होतो.

- **रोगाची माहिती:** श्वसनसंस्थेचा जुना विकार असलेल्या व्यक्तींना जंतुसंसर्ग होऊन सर्दी खोकला बळावण्याची शक्यता अधिक असते. हवामानात अथवा पाण्यात थोडा जरी बदल झाला तरी अशा व्यक्तींना लगेच संसर्ग होऊन सर्दी खोकला होतो. सारखे खोकून अशी व्यक्ती बेजार होते, शिवाय इतरांनाही जंतुसंसर्गाची लागण होते. श्वसनसंस्थेचे विकार जुनाट झाल्यास रुग्णाला पाठीवर झोपताना श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो, कारण छातीतील कफ फुप्फूसांमधे जास्त प्रमाणात पसरतो. अशा वेळी झोप देखील पूर्ण न झाल्यामुळे मानसिक अस्थैर्य येते व शारिरीक रित्या ही रुग्ण थकून जातो. ढगाळ वातावरण असताना,हवा गार असताना अथवा दमट वातावरणात अश्या व्यक्तींना अधिक त्रास होतो. छातीमधला कफ बाहेर न पडता आतच अडकून पडतो व धाप लागते. काही वेळेस खोकला कोरडा असल्यास खोकून खोकून घसा सुजतो. वाहन प्रवास अधिक करणाऱ्या व्यक्तींना असा त्रास होण्याची शक्यता अधिक असते. अती तिखट, तेलकट, आंबट पदार्थ अधिक प्रमाणात सेवन केल्यास, धूम्रपान केल्यास, अधिक काळ कोरडया हवेच्या संपर्कात आल्यास (वाहन प्रवास) उबळ येण्याची शक्यता असते.

- **सितोपॅट-एस् टॅब्लेट्सचे कार्य:** सितोपॅट-एस् टॅब्लेट्स मध्ये आयुर्वेदातील समीरपन्नग या रसौषधींचा वापर केला असल्यामुळे श्वसनसंस्थेच्या जुन्या आजारांवर उत्तम काम करतात. समीरपन्नग हे औषध श्वसनसंस्थेच्या जुनाट विकारांवर अत्यंत प्रभावी असे औषध आहे. पिंपळी, वंशलोचन, कंटकारी, जेष्ठीमध, अडुळसा यांमुळे श्वसनसंस्थेमधे तयार होणारा चिकटा नियंत्रित होतो व त्या अनुषंगाने होणारा जंतुसंसर्ग आपोआपच कमी होतो. छातीमधे अडकून पडलेला कफ पातळ होऊन बाहेर पडण्यास मदत होते व असे होऊन खोकल्याची उबळ कमी होते.खोकला कोरडा असल्यास पिंपळी, कंटकारी आदी द्रव्ये त्यावर उत्तम प्रभाव दर्शवतात. त्याचबरोबर वारंवार होणारा सर्दी खोकला कमी झाल्यामुळे श्वसनसंस्थेला ताकद मिळून रोग प्रतिकार शक्तीदेखील वाढते. व त्यामुळे वारंवार होणारा त्रास कमी होतो.खाजगी जीवनातील कायम असलेल्या या सर्दी खोकल्याच्या समस्येने सामाजिक जीवनावरही परिणाम होतो.

- **सितोपॅट-एस् टॅब्लेट्सचा डोस व कोर्स:** १ ते २ टॅब्लेट्स जेवणानंतर कोमट पाण्यासह १४ दिवस घेणे. गरजेनुसार वैद्यकीय सल्ला घेणे.

- **आहार विहार व पथ्य:** पिण्याचे पाणी उकळून गार केलेले असावे.अतितिखट, आंबट व तेलकट पदार्थाचे सेवन करू नये. दही, आंबटताक, चिकू, अननस, केळी, सिताफळ इत्यादी टाळावे. तांब्याच्या अथवा पितळेच्या भांडयातील पाणी प्यावे, फ्रिजमधील गार पाणी सेवन करू नये.

- **पॅकिंग व उपलब्धी:** ५० टॅबलेट



